# Library & Information Centre

## GIT in NEWS

**Pudhari 22-11-2015**



### जीआयटीमध्ये इक्वीटो २०१५ स्पर्धा कार्यशाळा उत्साहात

**बेळगाव : प्रतिनिधी**

कर्नाटक लॉ सोसायटीच्या गोगटे अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये दोन दिवसीय 'इक्वीटो २०१५' या स्पर्धा कार्यशाळा उत्साहात पार पडली. या स्पर्धेमध्ये प्रामुख्याने ऑटो, तांत्रिक या विषयावर प्रबंध सादर करण्यात आले होते. विद्यार्थ्यांमध्ये तांत्रिक शिक्षणाबाबत आवड निर्माण करण्याकरिता या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाला मुख्य अथिती म्हणून क्रेस्ट ग्लोबल कंपनीचे मुख्य अभियंता एच. एन. सत्यनारायण उपस्थित होते. त्यांचे यावेळी ॲटोमोटीव्ह इंडस्ट्रीजची ध्येयधोरणे या विषयावर व्याख्यान झाले. यावेळी त्यांनी इमर्जन्सी ब्रेकींग सिस्टीम, लेन डेपार्चर वॉरनिंग सिस्टीम आदी विविध विषयांवर मार्गदर्शन केले.

जीआयटी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. एस. देशपांडे यांनी स्वागत केले. याप्रसंगी अमेरिकेतील एस. ए. ई. आंतरराष्ट्रीय एरोडिझाईनमध्ये भाग घेतलेल्या जीआयटी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा परिचय करून देण्यात आला. 'सुप्रा २००६' अंतर्गत हे विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी होणार असून त्यांचे यावेळी लक्ष रेसिंग जीआयटी असे नामकरण करण्यात आले आहे.

**Pudhari 22-11-2015**



### जीआयटीमध्ये कौशल्य व्यवस्थापनावर कार्यशाळा

**बेळगाव : प्रतिनिधी** कर्नाटक लॉ सोसायटीच्या गोगटे अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये आयसीटी कौशल्य डेव्हलपमेंट सोसायटीत तसेच आयटी, बीटी या कर्नाटक सरकारच्या संस्थांमार्फत विद्यार्थ्यांसाठी दोन दिवसीय बुट कॅम्प आणि कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. सर्वो कंट्रोल एरोस्पेस इंडिया बेळगावचे मुख्य कार्यकारी अधिकारी दीपक धडोती मुख्य अतिथी म्हणून उपस्थित होते. दीपक धडोती यांनी भारतीय एरोस्पेस ते नासा याबाबत मार्गदर्शन केले. एरोस्पेसमध्ये केलेल्या कामाची माहिती त्यांनी दिली. अतिथी म्हणून उपस्थित अभिषेक लट्ठे यांचेही मार्गदर्शनपर भाषण झाले. किरुबा शंकर, डॉ. ए. मौलीश्री यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला जीआयटी महाविद्यालयाचे सदस्य आर. एस. मुतालिक-देसाई, प्राचार्य डॉ. ए. एस. देशपांडे उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. संतोष सराफ यांनी केले. विनायक होसमनी यांनी आभार मानले. कार्यक्रमाला बेळगाव, तुमकूर, गुलबर्गा आदी ठिकाणचे अभियांत्रिकी महाविद्यालयाचे विद्यार्थी उपस्थित होते.

Continued…

# LIBRARY & INFORMATION CENTRE

## GIT in NEWS

**Tarun Bharat 22-11-2015**



### जीआयटीतर्फे विद्यार्थ्यांसाठी शिबिर

**प्रतिनिधी**
बेळगाव

केएलएस संचालित गोगटे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीतर्फे दोन दिवशीय शिबिर घेण्यात आले. विद्यार्थ्यांना उद्योजकतेचे शिक्षण देऊन त्यांना प्रोत्साहन देणे हा शिबिराचा उद्देश होता. सर्व्हो कंट्रोल्स एअरोस्पेस इंडिया प्रा.लि.चे सीईओ, एमडी दीपक धडोती प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. 'घराच्या गॅरेजपासून नासाच्या कक्षेपर्यंतचा प्रवास' त्यांनी मांडला. सेन्स जीआयझेडचे सीईओ अभिषेक लट्टे, बिझनेस ब्लॉगर किरुबा शंकर, आयसीटीएसडीसीचे सीईओ डॉ. ए. मौलीश्री आदींनी मार्गदर्शन केले. व्यवस्थापन समिती सदस्य आर. एस. मुतालिक-देसाई, प्राचार्य डॉ. आनंद देशपांडे आदींनीही मार्गदर्शन केले. प्रा. संतोष सराफ व विनायक होसमनी यांनी सूत्रसंचालन केले.

**Times oF India 22-11-2015**



**Competition:** SAE India GIT Collegiate Club of KLS Gogte Institute of Technology organized a two-day competition – EQUI-TO-2015 – on automotive engineering. Auto-Quiz, a technical paper presentation and Drive Your Passion-Car Modelling Competition. At the valedictory function, guest HN Satyanarayana, chief engineer of Quest-Global Company, delivered a technical talk on 'Advancement and Future Prospects of the Automotive Industry'.

Continued…

# Library & Information Centre

## GIT in NEWS

**Times oF India 22-11-2015**

**Boot camp:** A two-day boot camp on entrepreneurship was conducted at KLS' GIT College. Deepak Dhadoti, CEO of Servo Controls Aerospace India Limited, spoke on the 'Thrilling Journey from Home Garage to NASA Orbit', which highlighted the hardships and bewitching experiences in his entrepreneurial career. Abhishek

Latthe, Kiruba Shankar, RS Mutalik (Desai) and principal Anand Deshpande were present.